नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २७/०१/२०२५ (सोमवार) सकाळ

## पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत रस्ता सुरक्षा अभियान २०२५ चे अनुशंगाने आरोग्य शिबीराचे आयोजन

मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण) यांच्या मार्गदर्शनात रस्ता सुरक्षा अभियान २०२५ चे औचित्य साधुन पोलीस स्टेशन अरोली च्या वतीने दि. २७/०१/२०२५ रोजी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले.

पोलीसांच्या दैनिक जिवनमानात स्वत:च्या आणि घरच्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे त्यांना एकाच छताखाली सर्व प्रकारच्या तपासण्या उपलब्ध व्हाव्यात या उदात्त हेतुने रस्ता सुरक्षा अभियान २०२५ चे औचित्य साधुन पोलीस स्टेशन चे अधिकारी, अंमलदार आणि त्यांचे कुटूंबिय तसेच पोलीस पाटील आणि गावकरी यांच्या आरोग्याची काळजी म्हणुन पोलीस स्टेशन अरोलीच्या प्रांगणात आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले.

आरोग्य शिबीरात उपस्थीत डॉक्टर आणि इतर वैद्यकीय कर्मचारी यांना श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक यांनी नविन तीन कायद्यासंदर्भात मार्गदर्शन करून शिबीरात उपस्थिती दर्शविली.

आरोग्य शिबिरामध्ये १५० लाभार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यामध्ये CBC, LFT, KFT, LIPID, RBS-F-P, TFT, HPLC, S.C, TORCH, C.A-125, C.A-19.9, HBSAG ह्याबाबत तपासणी करण्याकरिता रक्ताचे नमुणे घेण्यात आले. तसेच रक्तदाब मोजण्यात आला तसेच शुगर काउंन्ट घेण्यात आला. यामध्ये गरोदर मातांचे सुध्दा आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.

आरोग्य शिबीरात प्रामुख्याने अरोली गावाच्या प्रथम नागरीक ग्रामपंचायत सरपंच सौ रोषणी भूरे, श्री प्रशांत भुरे, श्री रोषन उमप, हजर होते. डॉ. राकेश नंदेश्वर, तालुका वैद्यकीय अधिकारी, मौदा, डॉ. शशांकी कापसे, साथरोग वैद्यकीय अधिकारी, डॉ. सारिका राऊत, डॉ. समिक्षा महल्ले, वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.कें. कोदामेंढी, डॉ. प्रणाली सुपारे, डॉ. सविता समरीत, श्री गणेश कुमरे, श्री सुखदेव सोनारघरे, श्री प्रभाकर तळेकर, श्री शेख, श्रीमती विशाखा कावळे, समिर चिमुरकर हे वैद्यकीय विभागाचे अधिकारी, कर्मचारी हजर होते.

आरोग्य शिबीर यशस्वी होण्यात पोलीस स्टेशन अरोली, नागपूर ग्रामीण चे ठाणेदार सपोनि स्नेहल राऊत यांच्या नेतृत्वात पोउपनि श्री कोळी, श्री जाधव, श्री सोनवने, स.फौ. जाधव, गेडाम, पोहवा. पुडके, जैस्वाल, बाजनघाटे, बघमारे, निखारे आणि इतर पोलीस कर्मचारी यांनी सहकार्य केले.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर